# निवडणूक निर्णय अधिकारी, जनसेवा को-ऑप. क्रेडीट सो. लि., मुंबई आणि जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, मुंबई शहर

जुने जकात घर, शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

ईमेल : collector.mumbaicity@maharashtra.gov.in दूरध्वनी क्र.:-022-22662440

---

जा.क्र.निवडणूक/जनसेवा क्रे./पो.बंदोबस्त/ ०५ /२०२६ दिनांक :-03/06/२०२६

प्रति,
पोलिस उपायुक्त,
(अभियान),
सी. पी. ऑफीस, मुंबई.

विषय :-जनसेवा को-ऑप. क्रे. सो. लि., मुंबई च्या संचालक मंडळ निवडणूकीकरीता पोलिस बंदोबस्त मिळणेबाबत.

संदर्भ :- मा. सेक्शन ऑफीसर, भारत सरकार, निवडणूक प्राधिकरण, दिल्ली यांचेकडील दि.२०/०५/२०२६ रोजीचे आदेश.

उपरोक्त संदर्भीय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- संदर्भीय आदेशान्वये माझी उपरोक्त नमूद आदेशान्वये जनसेवा को-ऑप. क्रे. सो. लि., मुंबई या संस्थेची निवडणूक घेणेकरीता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली असून निवडणूक कार्यक्रमानुसार शनिवार दि.०८/०८/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते सायं. ०४.०० या वेळेत **रॉयल स्पेस, ८/३०, ग्रॅण्ट बिल्डींग, अर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई येथे एका बुथवर** मतदान होणार असून एकूण ९६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतमोजणी प्रक्रीया दि.०९/०८/२०२६ रोजी स.०८.०० वाजेपासून ते मतमोजणी संपेपर्यंत चालू राहणार आहे.

मतदान व मतमोजणी सुरळीत व शांततेने पार पाडण्याच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त आवश्यक असून **दि.०८/०८/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते सायं.०४.०० वाजेपर्यंत व मतमोजणीच्या दिवशी दि.०९/०८/२०२६ रोजी ०८.०० वाजेपासून ते मतमोजणी संपेपर्यंत रॉयल स्पेस, ८/३०, ग्रॅण्ट बिल्डींग, अर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई या ठिकाणी ०१ पोलिस कॉन्स्टेबल (पुरूष) व ०१ महिला पोलीस कर्मचारी** नियुक्त करावेत तसेच मतदान दिनांक ०८/०८/२०२६ रोजी मतदान पक्रीया सायं. ०४.०० वा संपल्यानंतर सिलबंद मतपेटी सदर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील संस्थेच्या कार्यालयातील स्ट्रॉंगरुम मध्ये ठेवण्यात येणार आहे. **त्याकरिता दि.०८/०८/२०२६ रोजी सायं.०४.०० वाजेपासून ते मतमोजणी सुरु होईपर्यंत स्वतंत्र ०१ पोलिस कॉन्स्टेबल (पुरूष) व ०१ महिला पोलीस** यांची नियुक्ती करावी विनंती. सदर बंदोबस्ताबाबतचे विहीत शुल्क भरण्याबाबत अवगत केल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

Returning Officer
Election to the Board of Directors for 2026 to 2031
Janseva Co-operative Credit Society Ltd., Mumbai

(आंचल गोयल)
निवडणूक निर्णय अधिकारी
जनसेवा को-ऑप. क्रे.सो. लि., मुंबई आणि
जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-
वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुलाबा पोलिस ठाणे, मुंबई.